**E-Filing**

MHAU120009252025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.–३०१/२०२५**
**लिलाबाई सुरडकर वि. कोणीही नाही**

**निशाणी क्र. १ खालील आदेश**

**०१.** अर्जदार क्र.१ ते ५ यांनी सदरहु अर्ज हा मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ खाली दाखल केला आहे.

**०२.** अर्जदारांच्या अर्जात असे आले आहे की, मयत **रामदास जगदेव सुरडकर** यांचा मृत्यु दिनांक **०४.१०.२०११** रोजी मौजे महालब्धा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे झाला आहे. अर्जदार क्र.१ ही मयत रामदास यांची पत्नी, क्र.२ ते ५ हे मुले आहेत. मयत रामदास यांची आई गंगुबाई हया देखील मयत आहेत. तसेच अर्जदारांनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, ते मयत **रामदास जगदेव सुरडकर** यांचे वारस आहेत. सबब, अर्जदारांनी सदरचे प्रकरण हे मयत **रामदास जगदेव सुरडकर** यांचे वारस आहे, असे घोषित होवुन मिळणेबाबत दाखल केला आहे.

**०३.** अर्जदार क्र.२ **हरिदास रामदास सुरडकर** यांनी त्यांच्या शपथेवर पुरावा प्रतिज्ञालेख **नि.क्र.८** वर दाखल केला. तसेच अर्जदारांनी मयत यांचे मृत्युप्रमाणपत्र **नि.क्र.९** वर दाखल केले. त्यानंतर अर्जदार क्र.१ यांनी **नि.क्र.११** खाली पुरावा बंद पुरसीस दाखल केली.

**०४.** अर्जदार यांचे विधीज्ञ श्री. एस. आर. सुरळकर यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हे मयत **रामदास जगदेव सुरडकर** यांचे वारस आहे, तसेच अर्जदारांना शासकीय योजनांचा लाभ घेणेसाठी, इतर अनुषांगिक कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे अशी विनंती केली.

**०५.** विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अर्जाची व दाखल दस्तऐवजांची पाहणी केली. अर्ज दाखल केल्यानंतर सन १८२७ चा मुंबई विनियम ८ च्या नियम २ व ३ प्रमाणे न्यायालयाने अर्जदारांचे अर्ज मिळाल्यानंतर परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या नमुन्या नुसार घोषणापत्र काढले. त्यावरुन **औरंगाबाद** आवृत्तीच्या दिनांक १२.११.२०२५ रोजीच्या **"तरुण भारत"** आवृत्तीच्या पेपर मध्ये जाहीर नोटीस प्रकाशीत केली, ती **नि.क्र.१०** नुसार अभिलेखात दाखल आहे. तसेच

जाहीरनामा हा ग्रामपंचायत कार्यालय महालब्धा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे तसेच दिवाणी न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला त्याचा अहवाल **नि.क्र.५** नुसार अभिलेखात दाखल आहे.

**०६.** अर्जदारांच्या हक्कास आक्षेप घेणाऱ्या सर्व इसमांनी घोषणापत्राच्या तारखेपासुन एका महिन्याच्या आत न्यायालयास निवेदन करुन, आपल्या हरकती नोंदवाव्या अशी उक्त घोषणा पत्राव्दारे त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु त्यावरुन पुरेशी होईल, अशी कोणाचीही हरकत घेण्यात आली नाही. अर्जदारांनी दाखल केलेला पुरावा हा, हा उलटतपास न झाल्यामुळे अबाधित राहिला. अर्जदारांनी दाखल केलेले दस्तऐवज व अर्जदारांचा अबाधित पुरावा, यावरुन असे लक्षात येते की, **रामदास जगदेव सुरडकर** हे **दि.०४.१०.२०११** रोजी मयत झाले. तसेच अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत **रामदास जगदेव सुरडकर** यांचे वारस असल्याचे दिसुन येते. एकंदरीत सर्व बाजुचा विचार करुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्जदार क्र.१ ते ५ यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ प्रमाणे अर्जदार क्र.१ लिलाबाई रामदास सुरडकर, क्र.२ हरीदास रामदास सुरडकर, क्र.३ सुरदास रामदास सुरडकर, क्र.४ फुलवंताबाई सुभाष काडेलकर व क्र.५ कांताबाई गजानन गवळी हे मयत **रामदास जगदेव सुरडकर** यांचे मान्यता दिलेले वारस असल्याबाबतचे परिशिष्ट 'ब' मधील नियमानुसार योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन प्रमाणपत्र देण्यात यावे.

**३.** सदरच्या प्रमाणपत्राव्दारे मयताच्या मिळकतीवर अर्जदारांचा कुठल्याही प्रकारचा अधिकार प्रस्थापित होणार नाही.

**४.** अर्जदारांनी विहीत न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर त्यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

**५.** याव्दारे प्रकरण बंद करण्यात आले.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.04.29 17:31:11 +0530

**दिनांक** – २९.०४.२०२६

[एम. बी. पाटील]
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सोयगांव